# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

An ISO 9001:2008 Certified Corporation

मुख्य लेखापरीक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०२०६७३३१५२१

E-mail - audit@pcmcindia.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


परीपत्रक

क्र. मुलेप/१अ/कावि/३२ /२०२३

दि.०१-०५-२०२३

विषय- लेखापरीक्षण आक्षेपांचे अनुपालनांबाबत. . .

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागामार्फत महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम १०५ व १०६ नुसार केल्या जाणाऱ्या लेखापरीक्षणामध्ये मोठ्या संख्येने परिच्छेद प्रलंबित आहेत. प्रकरणी मा.आयुक्त सो. यांनी वेळोवेळी विभागप्रमुखांच्या बैठकीमध्ये लेखापरीक्षणातील प्रलंबित आक्षेपांचे / परिच्छेदांचे अनुपालनाबाबत सर्व संबंधितांना सुचना देखील दिलेल्या आहेत. त्यानुसार विविध विभागांमार्फत अनुपालने मुख्य लेखापरीक्षण विभागाकडे सादर केली जात आहेत. सदर प्राप्त झालेल्या आक्षेप अनुपालनांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे नमुद बाबी या कार्यालयाच्या निदर्शनास आलेल्या आहेत:

१. लेखापरीक्षण आक्षेपांची अनुपालने या कार्यालयाकडे सादर करीत असताना ती संगणक प्रणालीद्वारे देखील पाठविणे अपेक्षित आहे. तथापि अनुपालने संगणक प्रणालीद्वारे पाठविली जात नाहीत. परिणामी अशा आक्षेपांचे अनुपालन करीत असताना ती संगणक प्रणालीमधून वगळणे शक्य होत नाही.

२. प्राप्त अनुपालने वेळेत पुर्ण करणेकरीता सुट्टीच्या दिवशी जादा वेळात सदरचे कामकाज केले जात आहे. याकरीता मुख्यलेखापरीक्षण विभागामार्फत संबंधित विभागाकडे संपर्क साधून उपस्थित राहणेकामी पूर्वकल्पना दिली जाते. तथापि सदर दिवशी संबंधित कर्मचारी उपस्थित न राहिल्याने अनुपालने प्रलंबित राहत आहेत.

३. या कार्यालयाकडे सादर केलेल्या अनुपालनांबाबतचे पुरावे / कागदपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडल्या जात नाहीत. त्यामुळे संबंधित विभागाकडे वारंवार संपर्क साधून पुर्ततेबाबत कळवावे लागते. त्यामुळे देखील अनुपालनांच्या कार्यवाहीबाबत विलंब होत आहे.

४. अनुपालनाकरीता सादर केलेले आक्षेप यापूर्वी अमान्य केले असल्यास त्याबाबतच्या पत्राची प्रत देखील अनुपालनासोबत सादर करणे अपेक्षित आहे.

सबब प्रस्तुतचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना सुचित करण्यात येते की, उक्त नमुद १ ते ४ मुद्यांचे पालनासह परिपुर्ण अनुपालने सादर केल्यास आक्षेप मान्यतेबाबत लवकरात लवकर निर्णय घेणे या कार्यालयास शक्य होईल.

मुख्यलेखापरीक्षक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रती,

सर्व विभाग

D:\TABLE-1A\Audit\Letter_A4.docx